**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दिनांक : २९/०८/२०२६

***सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना परवानगी देणे कामी महानगरपालिकेची ऑनलाईन सेवा सुरू; सर्व गणेशोत्सव मंडळांनी रीतसर परवानगी घेऊनच उत्सव साजरा करणेचे आवाहन***

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना परवानगी देणे कामी वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत एक खिडकी योजना सुरू करण्यात आली असून यामध्ये ऑनलाईन पद्धतीद्वारे गणेशोत्सव मंडळांना अर्ज व कागदपत्र सादर करता येणार असून त्याची तपासणी झाल्यावर ऑनलाइन पद्धतीनेच गणेशोत्सव मंडळांना परवानगीची प्रत मिळणार आहे. यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी *https://mandap.onlinevvcmc.in/* या लिंक वर जाऊन आपला अर्ज भरून आवश्यक ती कागदपत्र अपलोड करावयाची आहेत.

महानगरपालिकेमार्फत ऑनलाईन पद्धतीने गणेशोत्सव मंडळांना परवानगी देण्याच्या या उपक्रमामुळे मंडळांना प्रत्यक्ष कार्यालयांना जाऊन अर्ज व कागदपत्र सादर करण्याचा त्रास कमी होणार असून आवश्यक ती माहिती ऑनलाईन पद्धतीने मिळणार आहे.
महानगरपालिका क्षेत्रातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी महानगरपालिकेच्या एक खिडकी योजनेद्वारे ऑनलाईन पद्धतीने रीतसर परवानगी घेऊनच गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.